## वार्षिक अहवाल १६.०८.२०१६ ते ३१ मार्च २०१७

युवा लक्ष्य बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेने या वर्षी अनेक उपक्रमावर काम करण्याचे उद्दिष्ट ठरवुन ते काम पार पाडण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सक्षमीकरण :-**

गावोगावी व शहरो शहरी अनेक महिला होतकरु असून, त्यांच्या हाताला रोजगार उपलब्ध होत नाही. तोच धागा धरुन अनेक गावात महिलांचे बचतगट निर्माण करण्याचे ठरविले. व संस्थेने कार्यकर्त्याच्या मदतीने महिलांची जनजागृती करुन, त्यांचे बचत गट निर्माण केले. व बचतगटाच्या माध्यमातुन त्यांना एकत्र करुन स्वयंरोजगार कसा निर्माण करावा, याचे मार्गदर्शन करण्यात आले.

त्यामध्ये त्यांना आम्ही आपल्या निर्सगत: डोंगरकपारीतील शेतामध्ये ज्या रानभाज्या मिळतात त्यांची माहिती देण्यात आली. उदा. चंदन बटवा ,तांदुळ कुंजीर,कडक शेपु, वागाटा, कुंडील ककडा भाजी, चुचुची भाजी, सराटयाची भाजी , फांजीची भाजी, शेलवटीचा तौर भाजी, कुरडुची भाजी, सराटयाची भाजी करडीची भाजी. इत्यादी. वरील भाज्यांचे गुणधर्म व शरीराला त्याची आवश्यकता का असते. या भाज्या नैसर्गिक व पावसाळयात रानावनात मिळतात. या भाज्यांना सरकारी खते, फवारणी वैगैरे रासायनिक नसते, त्यामुळे फवारणी केलेल्या भाज्या पेक्षा चविष्ट भाज्या व आयूर्वेदिक भाज्या, एकही रुपया न खर्च करता त्या आापल्याला मिळविता येतात. व आपल्या घरात या भाज्याचे सेवन केल्यामुळे कुठलाच आजार होत नाही. त्या नैसर्गिक असल्यामूळे आरोग्याला कोणतीच हानी पोहचत नाही. म्हणून महिलांचा रोजगाराचा प्रश्न आम्ही आमच्या मार्गदर्शनाने सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.



**शैक्षणिक उपक्रमः**

अंगणवाडया,बालवाडया तसेच शाळा भेटी देण्यात आल्या व या भेटीत शिक्षकांच्या भेटी घेतल्या,व त्यामध्ये बालकांचे वजन, उंची व आजार या विषयी चर्चा करण्यात आल्या व त्यांच्या आरोग्य तपासण्या विषयी प्रयत्न करण्यात आले. अंगणवाडीतील लहान मुलांमध्ये ‘कुपोषण’ होण्याचा धोका निर्माण होऊ नये, म्हणून त्यांचा आहार या विषयी वेळोवेळी माहिती घेऊन अंगणवाडया , बालवाडयास भेटी देण्यात आल्या व त्यांना मार्गदर्शन केले.



**क्रिडा उपक्रम :**

शाळेच्या मैदानात भेटी देवुन, त्या शाळेला, तसेच महाविद्यालयाला भेटी देवुन खेळाविषयी माहिती घेण्यात आली. यामध्ये अनेक विद्यार्थी हे कब्बड्डी, खो खो, मलखांब, कुस्तीकला, गोळा फेक ,धावणे. याचा सराव करताना दिसुन आले. त्यांच्या शिक्षकांची माहिती घेण्यात आली. व त्यामध्ये अनेक मुले राज्य जिल्हा स्तरावर खेळणार आहेत. व त्यांच्या महाविद्यालयाचे नाव उज्वल करणार आहेत, असे सांगण्यात आले. या उपक्रमाचा संस्थेच्या कार्यकर्त्यांनी वारंवार भेटी दिल्या व त्याविषयी माहिती घेतली व मार्गदर्शन हि करण्यात आले.



**महापुरुष जयंती / पुण्यतिथी उपक्रम :-**

जगामध्ये अनेक समाज सुधाकर संत होऊन गेले आहेत. तसेच आपल्या देशात समाजसुधारक ,देशभक्त, राष्ट्रसंत होउन गेले त्यांचे विस्मरण होऊ नये. त्यांनी देशाला दिलेले योगदान नव्या पिढ्यांना माहित व्हावे. व ते त्यांचे मार्गदर्शक व्हावे यासाठी संस्थेच्या वतीने जयंती, पूण्यतिथी साजरी करण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवरांना बोलावुन कार्यक्रम घेण्यात आले.



**सांस्कृतिक उपक्रम :-**

भारत देश हा अनेक कला गुणांनी संस्कृतीने जगात माहित आहे. आपल्या संस्कृतीचे जतन करण्याासाठी, लहान मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी, अंगणवाडी, शाळा, महाविद्याालये स्तरावर स्नेह मिलनाचे कार्यक्रम घेण्यात येतात. संस्थेचे कार्यकर्ते अशा शाळा, महाविदयालय येथे हजर राहुन कार्यक्रमाचे अवलोकन करण्याचे काम करण्यात येते. व अशा स्पर्धेतील पात्र मुलांना संस्थेच्या वतीने  बक्षीस देण्यात येते.

**शाळा बाहय मुलाचे सर्वेक्षण उपक्रम :-**

अहवाल काळात अंबाजोगाई तालुक्यातील लोकवस्तीत, तसेच विटभट्टया परिसरात भेटी देण्यात आल्या. विटभट्टी कामगार मजुरांचे पाल्यास शाळेत प्रवेश असुनही, दुर दुर असल्यामुळे तसेच मुलांच्या कामगार पालकांचे त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष असल्याचे आम्हाला जाणवले. म्हणुन संस्थेच्या कार्यकर्त्यांनी कामाच्या ठिकाणी वारंवार भेटी देवुन त्यांचे पाल्य शाळेत पाठविण्यासाठी कामगार पालकांना प्रवृत्त करण्यात आले. व अनेक मुलांना त्यांच्या पुर्वीच्या शाळेत पुनर्वसन करण्याचे काम करण्यात आले. या कामाची पावती आम्हाला शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक यांनी दिली. व संस्थेचे आभार मानले.



**राष्ट्रिय एकात्मता उपक्रमः-**

आपला देश अनेक धर्म, पंथ,जाती मध्ये विखुरला गेला आहे. आपण सर्व भारतीय आहोत, नंतर ही भारतीय राहूत हि कल्पना रुजविण्यासाठी राष्ट्रिय एकात्मता उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विचारवंत, प्राध्यापक, शिक्षक, समाजसेवक, राज्यकर्ते यांचे विचार व आपण सर्वांची देशाविषयी एकात्मता किती महत्वाची आहे. यावर एकमत करणे साठी अहवाल काळात संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मनापासून काम केले.

**जागतिक बँक योजना उपक्रमः-**

अहवाल काळात संस्थेच्या कार्यकर्त्यांनी शहरातील सरकारी बँका, तसेच खाजगी बँका यांना वारंवार भेटी दिल्या व अनेक महामंडळाच्या दारिद्रय रेषेतील लाभधारकांना कर्ज मंजुर करण्यास मदत करण्यात आली. त्या लाभधारकांनी संस्थेचे आभार मानले.

अहवाल काळात संस्थेने समाजातील शैक्षणिक, राष्टिय एकात्मता इत्यादी उपक्रमावर काम केले .

धन्यवाद!